

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानसभा नियमांन्वये


# अध्यक्षांनी दिलेले निदेश

# DIRECTIONS ISSUED BY THE SPEAKER

**(UNDER THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY RULES)**

**नववी आवृत्ती**

*NINTH EDITION*



**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

**2024**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानसभा नियमांन्वये

# अध्यक्षांनी दिलेले निदेश

# DIRECTIONS ISSUED BY THE SPEAKER

(UNDER THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY RULES)

## नववी आवृत्ती

*NINTH EDITION*

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

**2024**

[ किंमत ७२.०० ]

एचबी १५६७—१

## प्रस्तावना

अध्यक्षांनी महाराष्ट्र विधानसभा नियमांनुसार वेळोवेळी दिलेल्या सर्व निदेशांची ही नववी आवृत्ती आहे. नियमांत विशेष करून तरतूद न केलेल्या काही बाबींचे तसेच नियमांनुसार काम करण्यासंबंधीच्या इतर बाबींचे नियमन करण्याबाबतचे हे निदेश आहेत.

२. निरनिराळ्या तारखांना दिलेल्या या निदेशांना या आवृत्तीत नवीन क्रमांक दिलेले आहेत तसेच त्या त्या वेळी अंमलात असलेल्या महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या संबंधित आवृत्तीमधील नियमांच्या क्रमांकाचा संदर्भदेखील त्यामध्ये देण्यात आला होता. नियमांच्या क्रमांकाबाबतचे हे संदर्भ, महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या सध्याच्या म्हणजे तेराव्या आवृत्तीमधील नियमांच्या क्रमांकानुसार आता दुरुस्त करण्यात आलेले आहेत. यातील निदेश क्रमांक १८ व निदेश क्रमांक १९ पुनरीक्षित करण्यात आले असून निदेश क्रमांक २० या पुस्तिकेमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे.

३. संदर्भात एतद्‌विरुद्ध काही नसल्यास, या निदेशांतील शब्द व शब्द प्रयोग हे, महाराष्ट्र विधानसभा नियमात त्यांना जो अर्थ आहे त्याच अर्थाने वापरण्यात आले आहेत.

४. ही पुस्तिका मुख्यत्त्वेकरून सदस्यांकरिता असल्याकारणाने त्यांना ती उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

विधान भवन,<br>मुंबई,<br>दिनांक : २१ नोव्हेंबर, २०२४.

**जितेंद्र भोळे,**<br>सचिव-१ (कार्यभार)<br>महाराष्ट्र विधानसभा.

## PREFACE

This is the Ninth Edition Containing all the directions issued from time to time by the Speaker under the Maharashtra Legislative Assembly Rules. They relate to regulation of certain matters not specifically provided in the rules and also certain other matters regarding execution of business under the Rules.

2. These Directions issued on various dates have been renumbered in this Edition. They also contain references to Rule numbers in the relevant Edition of the Maharashtra Legislative Assembly Rules which was in force at that time. These references to the rule numbers have now been corrected to correspond with the rules in the present Edition *viz.* the Thirteenth Edition of the Maharashtra Legislative Assembly Rules. This Edition contains revised Direction No. 18 and Direction No. 19 as well as newly inserted Direction No. 20.

3. Unless the context otherwise requires, words and expressions used in these Directions have the same meanings as assigned in the Maharashtra Legislative Assembly Rules.

4. It is hoped that the booklet will prove useful to the Members to whom it is primarily meant.

VIDHAN BHAVAN :<br>Mumbai,<br>Dated 21st November, 2024.

JITENDRA BHOLE,<br>Secretary-1 (*I/C*),<br>Maharashtra Legislative Assembly.

एचबी ८४२–१अ

## अनुक्रमणिका


| निदेश क्रमांक | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | सभागृहाच्या कामकाजाचा पारस्पारिक प्राथम्यक्रम .. | ६ |
| २ | दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीत एकाच विषयावर असलेल्या प्रश्नांना एकत्र उत्तर देणे. | १२ |
| ३ | प्रश्नोत्तरांच्या यादीत तोंडी उत्तरांकरिता प्रश्नाचा, फेरीनुसार क्रम लावणे. | १४ |
| ४ | अल्पकालीन चर्चेच्या सूचना. .. .. .. | १६ |
| ५ | वित्तीय समितीच्या प्रमुखांना तशाच दुसऱ्या समितीच्या एखाद्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित करणे. | १८ |
| ६ | अशासकीय विधेयके आणि ठराव समिती .. .. | २० |
| ७ | विशेष हक्क समिती .. .. .. | २२ |
| ८ | कागदपत्रे व प्रकाशने सदस्यांमध्ये प्रसृत करणे. .. .. | ४२ |
| ९ | समितीचे अहवाल अध्यक्षांना सादर करणे .. .. | ४४ |
| १० | तारांकित प्रश्नांचे बॅलट .. .. .. | ४६ |
| ११ | अध्यक्ष/उपाध्यक्ष यांची निवडणूक .. .. .. | ४८ |
| १२ | अर्धा-तास चर्चा .. .. .. | ५० |
| १३ | लक्षवेधी सूचना .. .. .. | ५२ |
| १४ | संयुक्त/चिकित्सा समिती .. .. .. | ५४ |
| १५ | अंदाज समिती व लोकलेखा समिती यांच्या समिती प्रमुखांना रोजगार हमी योजना समितीच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित करणे. | ५६ |
| १६ | अंदाज समिती .. .. .. | ५८ |
| १७ | तारांकित, अतारांकित, अल्पावधी प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा, ठराव, प्रस्ताव इत्यादी, महाराष्ट्र विधानसभा नियमाप्रमाणे नोटीस देणे आवश्यक असणाऱ्या, संसदीय आयुधांच्या सूचना फॅक्सद्वारे स्वीकारणे—कार्यपद्धती. | ६० |
| १८ | अर्धा-तास चर्चा (सर्वसाधारण) .. .. .. | ६४ |
| १९ | अशासकीय ठरावांच्या सूचना स्वीकारणे. .. .. | ६६ |
| २० | स्थगन प्रस्तावाची सूचना स्वीकारणे. .. .. | ६८ |




## CONTENTS


| Direction No. | Subject | Page |
| --- | --- | --- |
| 1 | Relative Precendence of Business. .. .. | 7 |
| 2 | Answering together of Questions on the same subject appearing in a day's Starred Questions List. | 13 |
| 3 | Placing of Questions for Oral Answers in the List of Questions in rounds. | 15 |
| 4 | Notice for Discussion for Short Duration .. | 17 |
| 5 | Invitation to the Chairman of a Financial Committee to attend the Meeting of another such Committee. | 19 |
| 6 | Private Members' Bills and Resolution .. | 21 |
| 7 | Committee of Privileges .. .. .. | 23 |
| 8 | Circulation of Papers and Publications to Members | 43 |
| 9 | Presentation of Committee Reports to the Speaker | 45 |
| 10 | Ballot for Starred Questions .. .. | 47 |
| 11 | Election of Speaker/Deputy Speaker.. .. | 49 |
| 12 | Half-an-Hour Discussion .. .. .. | 51 |
| 13 | Calling Attention Notice .. .. .. | 53 |
| 14 | Joint/Select Committee .. .. .. | 55 |
| 15 | Invitation to the Chairman of Estimates Committee and Chairman, Public Accounts Committee to attend the Meetings of the Committee on Employment Guarantee Scheme. | 57 |
| 16 | Committee on Estimates .. .. .. | 59 |
| 17 | Acceptance through fax of the Notices of Parliamentary devices to be given under the M.L.A. Rules regarding Starred, Unstarred, Short Notice Questions, Calling Attention Notices, Half-an-Hour Discussion, Resolutions, Motions, etc.—Procedure. | 61 |
| 18 | Half-an-Hour Discussion (General) .. .. | 65 |
| 19 | Acceptance of Notices of Private members, Resolutions... | 67 |
| 20 | Acceptance of Notice of motions for Adjournment | 69 |

## महाराष्ट्र विधानसभा नियमांन्वये अध्यक्षांनी दिलेले निदेश

**पुनरीक्षित निदेश क्रमांक १ ***

**सभागृहाच्या कामकाजाचा पारस्पारिक प्राथम्यक्रम**

दिनांक १९ सप्टेंबर, १९६३ रोजी दिलेला निदेश क्रमांक १ रद्द करून महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८च्या तरतुदींनुसार अध्यक्षांनी खालील निदेश दिला आहे :—

**कामकाजाचा पारस्पारिक प्राथम्यक्रम.** अध्यक्षांनी अन्यथा निदेश दिला नसेल तर, सभागृहासमोर असलेल्या व खाली निर्दिष्ट केलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या पारस्पारिक प्राथम्यक्रम पुढील क्रमवारीनुसार असेल :—

(एक) : शपथ घेणे किंवा गांभीर्यपूर्वक दृढ कथन करणे.

(दोन) : प्रश्न (अल्पसूचना प्रश्नांसह).

(तीन) : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(चार) : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

(पाच) : मंत्र्यांचा परिचय.

(सहा) : अभिनंदनपर प्रस्ताव.

(सात) : शोक प्रस्ताव.

(आठ) : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

(नऊ) : सभागृहाच्या पटलावर ठेवावयाची कागदपत्रे.

(दहा) : पुरवणी मागण्या सादर करणे.

(अकरा) : अतिरिक्त मागण्या सादर करणे.

(बारा) : राज्यपालांकडून आलेले संदेश कळविणे.

(तेरा) : विधानपरिषदेकडून आलेले संदेश कळविणे.

(चौदा) : विधेयकांना राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.

(पंधरा) : विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याबद्दलची सूचना.

(सोळा) : सभागृहाच्या सदस्यांची अटक, स्थानबद्धता, किंवा सुटका, याबाबत दंडाधिकारी किंवा इतर प्राधिकाऱ्यांकडून आलेले संदेश.

* दिनांक २ ऑगस्ट, २००४ रोजी दिला.



## DIRECTIONS ISSUED BY THE SPEAKER UNDER THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY RULES

Revised Direction No. 1*

*Relative Precedence of Business of the House.*

In supersession of the direction No. 1, dated 19th September 1963, and in pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction :—

**Relative Precedence of Business.** Unless the Speaker otherwise directs the relative precedence of the classes of Business before the House, specified below, shall be in the follwoing order, namely :—

(I) : Oath or affirmation.

(II) : Questions (Including Short Notice Questions).

(III) : Laying of the copy of Governor's Address on the table of the House.

(IV) : Motion of thanks for the Governor's Address.

(V) : Introduction of Ministers.

(VI) : Congratulatory Motion.

(VII) : Condolence Motion.

(VIII) : Laying of Ordinances on the table of the House.

(IX) : Papers to be laid on the table of the House.

(X) : Presentation of Supplementary Demands.

(XI) : Presentation of Additional Demands.

(XII) : Communication of the Massages from the Governor.

(XIII) : Communication of the Messages from the ` Legislative Council.

(XIV) : Intimation regarding the President's assent to the Bills.

(XV) : Intimation regarding Governor's assent to the Bills.

(XVI) : Communication from Magistrate or other Authorities regarding arrest, detention or release of members of the House.

* Issued on 2nd August, 2004.

(सतरा) : विविध समित्यांचे अहवाल सादर करणे.

(अठरा) : अशासकीय विधेयके व ठराव यासंबंधीच्या समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व त्यास संमती देण्याबाबतचा प्रस्ताव.

(एकोणीस) : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सादर करणे व समितीच्या शिफारशी स्वीकृत करण्याबाबतचा प्रस्ताव.

(वीस) : महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १८१ अन्वये समितीपुढे सादर करण्यात आलेला पुरावा सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(एकवीस) : विनंती-अर्ज सादर करणे.

(बावीस) : विशेषाधिकार भंगाचे प्रश्न.

(तेवीस) : नियम ९७ अन्वये प्रस्ताव (स्थगन प्रस्ताव).

(चोवीस) : लक्षवेधी सूचना.

(पंचवीस) : पुरवणी मागण्यांवर चर्चा.

(सव्वीस) : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(सत्तावीस) : अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान.

(अठ्ठावीस) : अतिरिक्त मागण्यांवर चर्चा.

(एकोणतीस) : सभागृहाच्या बैठकीस सदस्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यासंबंधीची अध्यक्षांची घोषणा.

(तीस) : सभागृहातील सदस्यांचे राजीनामे, सभापती-तालिकेवर नामनिर्देशन, समित्या, इत्यादींसारख्या विविध विषयांसंबंधी अध्यक्षांची घोषणा.

(एकतीस) : अध्यक्षांनी दिलेले निर्णय किंवा केलेल्या घोषणा.

(बत्तीस) : म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्रीमहोदयांचे निवेदन.

(तेहतीस) : म.वि.स. नियम ४८ अन्वये सदस्यांचे वैयक्तिक निवेदन.

(चौतीस) : माजी मंत्र्यांनी आपल्या राजीनाम्यांच्या स्पष्टीकरणार्थ केलेले वैयक्तिक निवेदन.



(XVII) : Presentation of the reports of the committees.

(XVIII) : Presentation of the report of the committees on Private Members Bills and Resolution and Motion for giving consent to the same.

(XIX) : Presentation of report of the Business Advisory Committee and motion for adoption of the recommendations of the committee.

(XX) : Laying of evidence given before the committee *vide* Rule 181 of the Maharashtra Legislative Assembly Rules on the table of the House.

(XXI) : Presentation of Petitions.

(XXII) : Questions involving a Breach of Privilege.

(XXIII) : Notices under Rule 97.

(XXIV) : Calling Attention Notices.

(XXV) : Discussion on Supplementary Demands.

(XXVI) : Discussion on Budget.

(XXVII) : Discussion and Voting on Budgetary Demands.

(XXVIII) : Dicussion on Additional Demands.

(XXIX) : Announcement by the Speaker regarding leave of absence of Members from the sitting of the House.

(XXX) : Announcement by the Speaker regarding various matters such as resignations of Members of the House, nominations to Panel of Chairman, Committees, etc.

(XXXI) : Rulings or announcements by the Speaker.

(XXXII) : Statements by the Ministers under M.L.A. Rule 47.

(XXXIII) : Personal Statement by Members under M.L.A. Rule 48.

(XXXIV) : Personal statement by Ex-Ministers in explanation of his resignation.

(पस्तीस) : विधेयकासंबंधीतील चिकित्सा/संयुक्त समितीचा व विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याकरिता मुदतवाढीसंबंधीचा प्रस्ताव.

(छत्तीस) : अध्यक्षांना/उपाध्याक्षांना त्यांच्या पदावरून दूर करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव.

(सदतीस) : मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्याची परवानगी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव.

(अडतीस) : अल्पकालीन चर्चा.

(एकोणचाळीस) : विशेष हक्क समितीच्या अहवालावर विचार करणे.

(चाळीस) : विधेयके किंवा अहवाल/वैधानिक प्रस्ताव, अनियत-दिन प्रस्ताव, अंतिम आठवडा प्रस्ताव, इत्यादींसारखे प्रस्ताव यावरील चर्चा.

(एकेचाळीस) : अर्धा-तास चर्चा.

---



(XXXV) : Motion for extension of time for Presentation of Reports of Select/Joint Committee on a Bill and Privileges Committee.

(XXXVI) : Motion for leave to move Motion for Removal of Speaker/ Deputy Speaker.

(XXXVII) : Motion for leave to move Motion expressing want of Confidence in the Council of Ministers.

(XXXVIII) : Discussion for Short Duration.

(XXXIX) : Consideration on the Report of Committee of Privileges.

(XL) : Discussion on Bills or Reports, Motion such as Statutory Motions, No-day-yet-Named Motions, Last Week Motion etc.

(XLI) : Half-an-Hour Discussion.

---

**निदेश क्र. २*** **प्रश्न**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदींनुसार अनेक सदस्यांकडून असलेल्या विषयांवरील किंवा तद्नुषंगिक प्रश्नांना उत्तरे देण्यासंबंधीचे खालील निदेश अध्यक्ष देत आहेत :—

**दिवसाच्या तारांकित प्रश्नांच्या यादीतील एकाच विषयावरील प्रश्नांना एकत्र उत्तरे देणे.**

एखाद्या विशिष्ट दिवसाच्या प्रश्नोत्तरांच्या यादीत तोंडी उत्तरासाठी एखाद्या मंत्र्यांना उद्देशून एकाच किंवा तद्नुषंगिक विषयावर दोन किंवा अधिक प्रश्न विचारण्यात आले असल्यास, त्यातील पहिल्या प्रश्नाचे उत्तर देताना, अध्यक्ष, आपणहून किंवा एखाद्या सदस्याच्या विनंतीवरून, अशा प्रश्नांपैकी कोणत्याही किंवा सर्व प्रश्नांची उत्तरे, यादीतील त्यांचा प्राथम्यक्रम लक्षात न घेता, एकत्र देण्याचा निदेश देतील.

*दिनांक ११ नोव्हेंबर, १९६० रोजी दिला.



**Direction No. 2*** ***Questions***

In pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker is pleased to make the following direction in the matter of answering of questions on the same or allied subject received from several members :—

**Answering together of questions on same subject appearing in a day's starred question list.**

Where two or more questions on the same or allied subject addressed to a Minister for oral answer, appear on the list of questions for any particular day and when the first of them comes up for answer, the Speaker may, himself or on the request of any member, direct that any or all such questions be taken up together for answer, irrespective of the order in which they stand in the list.

*Issued on 11th November, 1960.

**निदेश क्र. ३*** **प्रश्न**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ८१ मध्ये असलेल्या तरतुदींनुसार तोंडी उत्तराकरिता असलेल्या प्रश्नांच्या याद्यांच्या मुद्रणाच्या बाबतीत अध्यक्ष खालील निदेश देत आहेत :—

**प्रश्नांच्या यादीतील तोंडी उत्तरांसाठी ठेवलेले प्रश्न फेऱ्यांनुसार व्यवस्थित मांडणे.**

एकाच दिवशी तोंडी उत्तरासाठी ठेवलेल्या प्रश्नांच्या यादीतील एकाच सदस्याच्या नावासमोर असलेले प्रश्न, त्याच्या नावाने स्वीकृत करण्यात आलेल्या प्रश्नाच्या क्रमांकानुसार मुद्रित करण्यात येतील, अशा रीतीने कोणत्याही दिवसाच्या यादीत ज्यांचे प्रश्न आहेत, अशा सर्व सदस्यांचा प्रत्येकी एक प्रश्न पहिल्या फेरीत राहील, आणि यादीतील सर्व सदस्यांचे प्रश्न संपल्यावर त्यांचे दुसरे व तिसरे प्रश्न असल्यास, ते अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या फेरीत योग्य स्थानी ठेवण्यात येतील. प्रत्येक फेरीतील प्रश्नांचा परस्पर अग्रक्रम त्याच्यासंबंधी आलेल्या सूचनांच्या वेळेनुसार व तारखेनुसार निश्चित करण्यात येईल.

*दिनांक ३१ ऑक्टोबर, १९६० रोजी दिला.



**Direction No. 3*** ***Questions***

In pursuance of the provisions of Rule 81 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker is pleased to make the following order in the matter of printing of lists of questions for oral answers :—

**Placing of questions for oral answers in the list of questions in rounds.**

Questions in the name of a Member in the list of questions for oral answer on a day shall be printed in three rounds or less according to the number of questions admitted in his name. Thus, all Members who have questions in the list of any day shall have one question each entered in the first round and after completing all the Members on the list, their second and third questions, if any, shall be appropriately placed in the second and third rounds respectively. Priority of questions *inter se* in each round shall be determined according to the time and date of receipt of the notices.

*Issued on 31st October, 1960.

**पुनरीक्षित निदेश क्र. ४*** **अल्पकालीन चर्चेची सूचना**

दिनांक २३ सप्टेंबर, १९७१ चा पुनरीक्षित निदेश क्रमांक ४ रद्द करून आणि महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १०१ अन्वये द्यावयाच्या सूचनांच्या बाबतीत अध्यक्ष खालील निदेश देत आहेत :—

तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १०१ अन्वये सूचना देण्याची सदस्यांची इच्छा असल्यास अशा सूचना अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ३ दिवसांहून अगोदर नव्हे अशा बेताने पोहोचतील अशा पाठवाव्यात.

*दिनांक ११ ऑगस्ट १९९९ रोजी दिला.



**Revised Direction No. 4*** ***Notice for Discussion for Short Duration.***

In supersession of the Direction No. 4, dated 23rd September 1971 and in accordance with the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, The Speaker is pleased to issue the following direction in respect of notices to be given under Rule 101 of the Maharashtra Legislative Assembly Rules :—

A member, desiring to give notice under Rule 101 of the Maharashtra Legislative Assembly Rules for raising discussion for short duration on a matter of urgent public importance, should send such notices so as to reach not earlier than 3 days before the commencement of the Session.

*Issued on 11th August, 1999.

**पुनरीक्षित निदेश क्र. ५***

**समिती प्रमुख, अंदाज समिती, लोकलेखा समिती आणि सार्वजनिक उपक्रम समिती**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १९० अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व निदेश क्रमांक ५, दिनांकित ५ ऑक्टोबर, १९६० रद्द करून अध्यक्षांनी खालील निदेश दिलेला आहे, तो येणेप्रमाणे :—

**वित्तीय समितीच्या प्रमुखांना तशाच दुसऱ्या समितीच्या एखाद्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी आमंत्रित करणे.**

अंदाज समिती, लोकलेखा समिती किंवा सार्वजनिक उपक्रम समिती या तीन वित्तीय समित्यांपैकी कोणत्याही एका समितीला आवश्यक वाटल्यास बाकी राहिलेल्या दोन समित्यांपैकी कोणत्याही समितीच्या प्रमुखाला आपल्या बैठकीला उपस्थित राहण्याचे ती आमंत्रण देऊ शकेल.

*दिनांक २४ डिसेंबर, १९७१ रोजी दिला.



**Revised Direction No. 5***

***Chairman, Estimates Committee, Public Accounts Committee and Public Undertakings Committee.***

In exercise of the powers conferred on him by Rule 190 of the Maharashtra Legislative Assembly Rules and in supersession of Direction No. 5, dated 5th October 1960, the Speaker has issued the following direction, namely :—

**Invitation to the Chairman of a Financial Committee to attend the meeting of another such Committee.**

Any of the three Financial Committees, namely, the Estimates Committee, the Public Accounts Committee or the Public Undertakings Committee may, if it so considers necessary, invite the Chairman of any of the remaining two Committees to attend its meeting.

*Issued on 24th December, 1971.

**पुनरीक्षित निदेश क्र. ६*** **अशासकीय विधेयके व ठराव समिती**

दिनांक २७ जुलै १९६६ रोजी दिलेला निदेश क्रमांक ६ रद्द करून व महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ व नियम १९० (३) मधील तरतुदींनुसार अशासकीय विधेयके व ठराव यांच्या बाबतीत अध्यक्षांनी खालील निदेश दिला आहे :—

**अशासकीय विधेयके व ठराव यांवर चर्चा करण्याकरिता वेळ देणे.**

(१) अशासकीय विधेयकांसाठी किंवा ठरावांसाठी निश्चित करण्यात आलेल्या कोणत्याही दिवशी दाखवावयाच्या अशासकीय विधेयकांच्या किंवा ठरावांच्या बाबतीत अशासकीय विधेयके व ठराव समिती, त्यासंबंधीची चर्चा करण्याकरिता वेळ देण्यासाठी झालेल्या तिच्या बैठकीत आपल्या विधेयकासंबंधीचे किंवा ठरावासंबंधीचे कामकाज पुढे चालविण्याची कोणत्याही संबंधित सदस्याची इच्छा आहे काय, याबाबत प्रत्येक संबंधित सदस्याकडून लेखी किंवा तोंडी खात्री करून घेईल. आपल्या विधेयकासंबंधीचे किंवा ठरावासंबंधीचे कामकाज पुढे चालविण्याची आपली इच्छा नाही असे त्याने कळविल्यास, किंवा वरीलप्रमाणे माहिती तोंडी किंवा लेखी न कळविल्यास, त्याच्या विधेयकासाठी किंवा ठरावासाठी समिती कोणतीही वेळ देणार नाही.

(२) ठराविक दिवसाच्या कामकाजाच्या कार्यक्रमपत्रिकेत फक्त समितीने वेळ नेमून दिलेल्या अशासकीय विधेयकांचा किंवा ठरावांचा समावेश बॅलटद्वारा निश्चित केलेल्या त्यांच्या पारस्पारिक प्राथम्यक्रमानुसार करण्यात येईल.

(३) अशासकीय ठरावांच्या बाबतीत नियम १०६(४) अन्वये चर्चेसाठी उपलब्ध असलेल्या तीन किंवा त्यापेक्षा कमी ठरावांसाठी समिती वेळ नेमून देईल.

(४) अशासकीय विधेयकांच्या बाबतीत पुरःस्थापित झालेल्या विधेयकांचे बॅलेट घेण्यात येऊन बॅलेटद्वारा निश्चित केलेल्या त्यांच्या पारस्पारिक प्राथम्यक्रमानुसार सहा विधेयकांची यादी करण्यात येईल आणि बॅलेटमध्ये आलेल्या विधेयकांच्या प्रभारी सदस्यांच्या पूर्वसंमतीनुसार चार किंवा त्यापेक्षा कमी विधेयकांना समिती वेळ नेमून देईल.

*दिनांक २ ऑगस्ट, २००४ रोजी दिला.



**Revised Direction No. 6*** ***Committee on Private Members' Bills and Resolution.***

In supersession of Direction No. 6, dated 27th July, 1966 and in pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, read with Rule 190 (3) of the said Rules, the Speaker is pleased to issue the following direction in the matter of Private Members' Bills and Resolutions :—

**Allotment of time for the discussion of Private Members' Bills and Resolutions.**

(1) In respect of Private Members' Bills or Resolutions due to be shown on any day fixed for such business, the Committee on Private Members' Bills and Resolutions shall ascertain from each member concerned, in writing or orally, at the meeting held for allotment of time, for discussion, whether he wishes to proceed with his Bill or Resolution. If he intimates that he does not wish to proceed with his Bill or Resolution or fails to give intimation orally or in writing as aforesaid, the committee may not allot any time for his Bill or Resolution.

(2) Only those Private Members' Bills or Resolutions for which time has been allotted by the committee shall be included in the order of Business for the appointed day in order of their relative precedence as determined by the ballot.

(3) In the case of Private Members' Resolutions, the committee shall allot time to three or less number of Resolutions which are available for discussion by virtue of Rule 106 (4).

(4) In respect of Private Members' Bills, the list of Six Bills shall be prepared by taking out ballot of the introduced Bills and in order of their relative precedence as determined by ballot and out of these Bills the committee shall allot time to four or less number of Bills with the consent of the members concerned.

*Issued on 2nd August, 2004.

**निदेश क्र. ७*** **विशेषाधिकार समिती**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २८३ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांनी खालील निदेश दिले आहेत :—

**व्याख्या.** १. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या निदेशात,—

(अ) " समिती " या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २७८ अन्वये अध्यक्षांनी नियुक्त केलेली समिती ;

(ब) " समिती प्रमुख " या शब्दाचा अर्थ विशेषाधिकार समितीचे समिती प्रमुख ;

(क) " बैठक " या शब्दाचा अर्थ विशेषाधिकार समितीची बैठक ;

(ड) " सदस्य " या शब्दाचा अर्थ विशेषाधिकार समितीचा सदस्य ;

(ई) " नियम " या शब्दाचा अर्थ महाराष्ट्र विधानसभा नियम.

**सर्व परक्या इसमांनी समितीच्या बैठकीतून निघून जाणे.** २. समितीचे सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी आणि समिती प्रमुखांनी बैठकींना उपस्थित राहण्याची परवानगी दिलेल्या इतर व्यक्ती यांव्यतिरिक्त सर्वजण बैठकीतून निघून जातील.

**भाषण करताना सदस्यांनी समिती-प्रमुखांना उद्देशून भाषण करणे.** ३. (अ) समितीच्या बैठकीत भाषण करू इच्छिणाऱ्या सदस्यांना समिती प्रमुखांना उद्देशून भाषण करावे आणि इतर सदस्यांच्या बाबतीत द्यावयाचे अभिप्राय त्यांच्यामार्फत द्यावेत.

**समिती-प्रमुखांनी सांगितल्या-खेरीज सदस्यांनी भाषण न करणे.** (ब) समिती प्रमुखांनी सांगितल्याखेरीज सदस्यांनी भाषण करू नये.

**सदस्यांनी अडथळा आणणे.** (क) दुसरा एखादा सदस्य भाषण करीत असताना, कोणताही सदस्य त्यात अडथळा आणू इच्छित असल्यास, तसे करण्यास त्याला समिती प्रमुखांची परवानगी घ्यावी लागेल.

**समिती-प्रमुखाने प्रश्न मतास टाकणे.** (ड) कोणत्याही प्रश्नावर पुरेशी चर्चा झाली आहे असे समिती प्रमुखांस वाटले तर अधिक चर्चा न होऊ देता तो प्रश्न मतास टाकण्याचा आणि निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार आहे.

---

*दिनांक ७ नोव्हेंबर, १९६० रोजी दिला.



**Direction No. 7*** ***Committee of Privileges.***

In pursuance of the provisions of Rule 283 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker, Maharashtra Legislative Assembly, is pleased to issue the following directions, namely :—

1. In these directions, unless the context otherwise requires,— **Definitions.**

(*a*) " Committee " means the Committee of Privileges appointed by the Speaker under Rule 278 of the Maharashtra Legislative Assembly Rules ;

(*b*) " Chairman " means the Chairman of the Committee of Privileges ;

(*c*) " Meeting " means the meeting of the Committee of Privileges ;

(*d*) " Member " means a Member of the Committee of Privileges ;

(*e*) " Rules " means the Maharashtra Legislative Assembly Rules.

2. All persons, other than the Members of the Committee, the officers of the Maharashtra Legislature Secretariat and such other persons as may be expressly permitted by the Chairman to attend the meetings, shall withdraw from the sittings of the Committee. **All strangers to withdraw from sittings of the Committee.**

3. (*a*) A member desiring to make any observations at the sittings of the Committee shall address the Chairman and make all remarks to other members through him. **Members to address Chairman while speaking.**

(*b*) A member shall not speak unless the Chairman calls him. **Members not to speak unless called by Chairman.**

(*c*) Any member who desires to interrupt, while another member is speaking, shall seek the permission of the Chairman to do so. **Interruption by Member.**

(*d*) The Chairman may, if he considers that sufficient discussion has taken place on a question, put the question without further discussion, to vote and arrive at a decision. **Chairman to put the question to vote.**

---

*Issued on 7th November, 1960.

**प्रश्न फेरविचारासाठी घेणे.**

(ई) समितीने आधीच निर्णय घेतला आहे असा कोणताही प्रश्न फेरविचारासाठी घेण्यात यावा अशी एखाद्या सदस्याची इच्छा असेल तर त्याने तसे करण्यासाठी सर्वप्रथम समिती प्रमुखाची परवानगी मिळविली पाहिजे.

**समिती प्रमुखाने समितीच्या कामाचे नियमन करणे.**

४. समितीच्या बैठकीमधील कामकाज चालविताना ज्यासाठी नियमांमधून आणि निदेशांमधून खास करून तरतूद केलेली नाही त्या गोष्टींचे नियमन करण्याचा समितीप्रमुखास अधिकार राहील आणि त्यांनी समितीच्या बैठकी चालू असता उपस्थित करण्यात आलेले कार्यपद्धतीविषयक सर्व प्रश्न, आणि हरकतीचे मुद्दे, तशाच गोष्टीबाबत असतील ते निर्बंध लक्षात घेऊन, निकालात काढले पाहिजेत आणि त्यावरील त्यांचा निर्णय अखेरचा राहील.

**कार्यवाहीचा वृत्तांत लिहून ठेवणे.**

५. (अ) समितीच्या कार्यवाहीचा शब्दशः वृत्तांत सचिवाच्या कार्यालयाने लिहून ठेवला पाहिजे.

(ब) अशा कार्यवाहीच्या प्रती समितीप्रमुखाच्या आदेशानुसार समितीच्या सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.

**कार्यवाही किंवा अहवाल सभागृहाला सादर करण्यात येत नाही तोपर्यंत गोपनीय समजणे.**

६. (अ) समितीचा अहवाल किंवा तिने तात्पुरते किंवा अंतिमरीत्या घेतलेले निर्णय यासहित तिची कार्यवाही सभागृहाला सादर करण्यात येत नाही तोपर्यंत गोपनीय समजली गेली पाहिजे आणि समितीला कार्यवाहीचा सर्व किंवा एक भाग किंवा गोषवारा सभागृहासमोर ठेवण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार आहे.

(ब) समितीच्या सदस्यांकडे “ गुप्त ” किंवा “ गोपनीय ” असा शिक्का मारून पाठविलेल्या कोणत्याही कागदामधील किंवा दस्तऐवजामधील मजकूर कोणत्याही सदस्यास अध्यक्षांच्या परवानगीशिवाय सभागृहात किंवा अन्य प्रकारे प्रकट करता येणार नाही.

**कार्यवाहीतील असंसदीय असंबद्ध, अशिष्ट शब्दप्रयोग गाळून टाकणे.**

७. (अ) समितीची कार्यवाही चालू असता तिजकडे सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजात किंवा कोणाही सदस्याने व्यक्त केलेल्या अभिप्रायात किंवा अभिमतात असंसदीय, असंबद्ध असे शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग आहेत किंवा त्या अभिप्रायांची किंवा अभिमतांची भाषा सौजन्यशील, शिष्टसंमत आणि संयमी नाही किंवा एक प्रकारे अयोग्य अशी आहे असे समितीप्रमुखांचे मत असेल तर त्यांना ते शब्द, शब्दप्रयोग किंवा वाक्यप्रयोग कार्यवाहीतून गाळून टाकण्यासाठी आदेश देण्याचा अधिकार आहे.

(ब) वर (अ) मध्ये काहीही असले तरी अध्यक्षांना अशाच परिस्थितीत कार्यवाहीतील कोणताही भाग गाळून टाकण्यासाठी आदेश देण्याचा तसेच गाळून टाकण्यासंबंधीच्या सर्व निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार आहे आणि त्यांचा निर्णय अखेरचा राहील.



**Re-opening of question.**

(*e*) A member desiring to reopen a question on which the Committee has already taken a decision, shall, in the first instance, obtain the permission of the Chairman to do so.

**Chairman to regulate the work of Committee.**

4. The Chairman shall have power to regulate the conduct of meetings of the Committee in all matters not specifically provided for in the rules and the directions and subject to like restrictions decide all questions of procedure and points of order, etc., raised in the course of the meetings of the Committee and his decision thereon shall be final.

**Record of Proceedings.**

5. (*a*) A verbatim record of the proceedings of the Committee shall be maintained by the Secretary's Office.

(*b*) Copies of such proceedings may, under the directions of the Chairman, be made available to all the members of the Committee.

**Proceedings and Report to be treated as confidential until presentation to the House.**

6. (*a*) The proceedings of the Committee including it's report or any conclusions arrived at, tentatively or finally, shall be treated as confidential until their presentation to the House and the Committee may direct that the whole or a part of the proceedings of the Committee or a summary thereof may be laid on the table of the House.

(*b*) No contents of any paper or document marked " Secret " or " Confidential " which is circulated to the members of the Committee shall, except with the express permission of the Speaker, be divulged by any member on the floor of the House or in any other manner.

**Expunction of unparliamentary, irrelevant or discourteous expressions from proceedings.**

7. (*a*) The Chairman may, if in his opinion any document presented to the Committee or any remarks or observations made by anyone in the course of the proceedings of the Committee contain words, phrases or expressions which are unparliamentary, irrelevant or are not couched in respectful, decorous and temperate language, or are otherwise, inappropriate, order such words, phrases or expressions to be expunged from the proceedings.

(*b*) Notwithstanding anything contained in (*a*) above, the Speaker shall in like circumstances, have powers to order expunction or to review all decisions regarding expunction from the proceedings and his decision thereon shall be final.

**समितीची प्राथमिक बैठक**

८. अध्यक्षांनी नियम २७७ किंवा २८४ खाली विशेषाधिकारभंगाचा प्रश्न विशेषाधिकार समितीकडे सोपविल्यानंतर समिती प्रमुखाने शक्य तितक्या लवकर विशेषाधिकाराच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी समितीची प्राथमिक बैठक बोलाविली पाहिजे आणि त्यासंबंधात करण्यात आलेले खास नियम व निदेश लक्षात घेऊन चौकशीखालील विषयाबाबत तिच्या मते सामान्यतः अनुसरण्यात येणारी सर्वोत्तम कार्यपद्धती निश्चित केली पाहिजे.

**समितीने सकृत-दर्शनी विशेषा-धिकारभंग झाला आहे की नाही ते ठरविणे.**

९. समितीसमोर ठेवण्यात आलेले संबंधित कागदपत्र पाहिल्यानंतर सकृत-दर्शनी विशेषाधिकारभंगाचे प्रकरण सिद्ध झालेले नाही असे तिचे मत झाले तर तिला त्याप्रमाणे विधानसभेकडे अहवाल सादर करता येईल.

**साक्षीदारांना सूचना.**

१०. अधिक चौकशी करणे आवश्यक आहे असे समितीस वाटले तर तिला तसा पुरावा घेण्याचा, ती ठरविल त्या क्रमाने साक्षीदार तपासण्याचा आणि साक्षीदाराकडे विहित नमुन्यात सूचना जारी करण्याचा अधिकार आहे (पहिले परिशिष्ट : नमुने ‘ अ’, ‘ ब ’).

**पुरावा शपथेवर घेणे.**

११. समितीने विहित नमुन्यात शपथ घेण्यास लावून पुरावा घेतला पाहिजे (पहिले परिशिष्ट : नमुने ‘ क ’).

**साक्षीदार तपासण्याची पद्धती**

१२. समितीला साक्षीदारांची साक्ष घेताना कार्यपद्धतीचे दृष्टीने आवश्यक वाटले तर देशातील सर्वसाधारण कायद्यांचा, उदाहरणार्थ व्यवहार प्रक्रिया संहिता, दंड प्रक्रिया संहिता, पुराव्यासंबंधीचा कायदा वगैरे आणि स्वाभाविक न्यायाची तत्त्वे यांचा अवलंब करता येईल.

**सर्व संबंधित माहिती हजर करण्यास साक्षीदारास आदेश देण्याचा अधिकार.**

१३. विचाराधीन असलेल्या चौकशीखाली प्रत्यक्षतः येत नसली तरी संबंधित अन्य माहिती आपणासमोर सादर करण्यास समितीस कोणाही साक्षीदारास सांगता येईल.

**वकिलामार्फत हजर राहणे.**

१४. संबंधित पक्षकारांचे म्हणणे त्यांनी नियुक्त केलेल्या वकिलामार्फत ऐकण्यास समिती अध्यक्षांची परवानगी घेऊन, परवानगी देऊ शकेल.



**Preliminary meeting of committee.**

8. After a question of breach of privilege has been referred by the Speaker to the Committee of Privileges either under Rule 277 or 284 the Chairman shall, as soon as practicable, call a preliminary meeting of the Committee to consider the said question of privilege and to determine, subject to the specific provisions made in this behalf in the Rules and the directions, the procedure generally to be followed in regard to the matter under inquiry, which, in its opinion, is most suited for the purpose.

**Committee to decided whether *prima facie* case of breach of privilege exists.**

9. If, after going through the relevant material placed before it, the Committee is of opinion that a *prima facie* case of breach of privilege has not been made out, it may report to the Assembly accordingly.

**Notice to witnesses.**

10. If the Committee considers that further inquiry is necessary, it may take such evidence and examine such witnesses and in such order as it may determine and may issue notices in the prescribed form to the witnesses (First Schedule: Forms ‘ A ’ and ‘ B ’).

**Evidence to be taken on oath.**

11. All evidence before the Committee shall be taken on oath in the prescribed form (First Schedule : Forms ‘ C ’).

**Procedure for examining witness.**

12. The Committee may in the examination of witnesses be guided, wherever necessary so far as; procedural matters are concerned, by the principles of ordinary law of the land such as the Civil Procedure Code, the Criminal Procedure Code and the Law of Evidence, etc., and the principles of natural justice.

**Power to order witness to produce all relevant information.**

13. A witness may be asked to place before the Committee any other relevant information which, though not actually covered by the enquiry under consideration, the Committee may think necessary.

**Appeal through Counsel.**

14. The Committee may, under the directions of the Speaker, permit the concerned parties to be heard by a Counsel appointed by them and approved by the Committee.

(शा.म.मु.) एचबी १५६७–५ (२००–११-२०२४)

**साक्षीदाराकरिता खर्च.** १५. (अ) साक्षीदाराला किंवा साक्षीदारांना साक्षीचे ठिकाणी येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवास वगैरे कारणांवरून होणारा खर्च त्यांना बोलाविणाऱ्या पक्षकारांनी केला पाहिजे.

(ब) समितीने आपणहून बोलाविलेल्या साक्षीदारांबाबत, त्यांचा प्रवासखर्च खालील तरतुदींनुसार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाला सोसावा लागेल :—

(एक) सरकारी नोकरांच्या निरनिराळ्या श्रेणींची तुलना करून, समितीने बोलाविलेल्या साक्षीदाराचा किंवा साक्षीदारांचा दर्जा, यथास्थिती, सचिवालय प्रथम निश्चित करील.

(दोन) वर दाखविल्याप्रमाणे, साक्षीदाराचा दर्जा निश्चित केल्यानंतर, तुलनात्मक दर्जाप्रमाणे सरकारी नोकराला, मुंबई नागरी सेवा नियमांखाली मिळण्यायोग्य असलेल्या दराप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात येईल.

**अहवालाचा मसुदा.** १६. (अ) समितीच्या अहवालाचा मसुदा सचिव तयार करतील आणि समितीप्रमुखांनी त्याला मान्यता दिल्यानंतर तो समितीसमोर ठेवण्यात येईल.

(ब) अहवालाच्या मसुद्यासंबंधात इतर कोणत्याही कागदपत्रांसहित, त्याच्या टंकलिखित, चक्रमुद्रित किंवा अंतिम मुद्रणपूर्व प्रती, त्यावर विचार करण्याचे वेळी किंवा विचार करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेपूर्वी समितीच्या सभासदांमध्ये प्रसृत करण्याचा समितीप्रमुख निदेश देतील.

**आदेशिका बजावण्या-संबंधीचा नमुना** १७. अध्यक्षांच्या, सभापतींच्या, समितीच्या किंवा सभागृहाच्या आदेशानुसार, यथास्थिती, कोणत्याही व्यक्तीवर बजाविण्यात यावयाच्या एखाद्या आदेशिकेसंबंधात, प्रत्येक बाबतीत आवश्यक असलेल्या परिस्थितीप्रमाणे त्यातील फेरबदलासहित, ती आदेशिका दुसऱ्या अनुसूचीत दर्शविलेल्या नमुन्याप्रमाणे बजावण्यात येईल. त्यात नमूद केलेल्या त्या त्या कारणांसाठी सदरहू नमुन्यांचा उपयोग करण्यात येईल.



**Expenses of witnesses.** 15. (*a*) The expenses on travelling etc., of a witness or witnesses at the place of examination shall be borne by the respective parties which call such witness or witnesses ;

(*b*) In the case of witnesses summoned by the Committee on its own motion, the expenditure on their travelling shall be borne by the Maharashtra Legislature Secretariat in accordance with the following provisions :—

(*i*) The Secretariat shall, in the first instance, determine, on the analogy of the various categories of Government employees, the status of the witness or witnesses, as the case may be, who may be summoned by the Committee.

(*ii*) After determining the status of a witness as aforesaid, the Travelling Allowance shall be paid to him at the rate as is admissible under the Bombay Civil Services Rules to a Government employee of a comparable status.

**Draft report.** 16. (a) The draft report of the Committee shall be prepared by the Secretary and may be placed before the Committee after it is approved by the Chairman.

(*b*) The Chairman may direct that the typed, cyclostyled or proof copies of the draft report, together with any other documents connected therewith, be circulated amongst the members of the Committee at the time of, or before the date fixed for, the consideration of the draft report.

**Form for service of legal process.** 17. With regard to any legal process to be served on any person in pursuance of the orders of the Speaker, the Chairman, the Committee, or of the House, as the case may be, such process shall be served in the forms set out in the Second Schedule with such variations as the circumstances of such case may require. The said forms shall be used for the respective purposes therein mentioned.

## पहिली अनुसूची
(परिच्छेद १० पहा)

**अ**

**विशेषाधिकार भंगाचा आरोप करण्यात आलेल्या व्यक्तींवर बजावण्यात यावयाच्या सूचनेचा नमुना**

क्रमांक
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन :
मुंबई/नागपुर, दिनांक

प्रेषक,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ
प्रति,
....................................

महोदय,

महाराष्ट्र विधानसभेचा विशेषाधिकार भंग करण्यासंबधीचा ..........................................तून उद्‌भवलेल्या प्रश्न श्री./श्रीमती .............................. यांनी दिनांक रोजी विधानसभेत उपस्थित केला होता, असे आपणांस कळविण्यात येत आहे. अध्यक्षांनी हा प्रश्न परीक्षणासाठी, त्यावर निर्णय घेण्यासाठी आणि विधानसभेला त्याची माहिती कळविण्यासाठी विशेष हक्क समितीकडे पाठविला आहे.

२. मुंबई/नागपूर येथील विधान भवनात, दिनांक रोजी वाजता आणि त्यानंतर समिती वेळोवेळी ठरविल त्या दिवशी किंवा त्यावेळी, समिती हा प्रश्न परीक्षणासाठी आपल्या हाती घेईल, याची कृपया दखल घेण्यात यावी. विधानसभेचा विशेषाधिकार भंग करण्याबाबत आपल्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी याची शिफारस का करण्यात येऊ नये याचे काही कारण असल्यास, ते दाखवून देण्याची आपणाला संधी देण्यात येत आहे. या प्रश्नाचे परीक्षण करण्यात येईल तेव्हा, आपली इच्छा असल्यास, आपण समितीची कार्यवाही चालू असेल त्यावेळी उपस्थित राहू शकता. आपणांस काही पुरावा द्यावयाचा असल्यास किंवा काही कागदपत्र दाखल करावयाचे असल्यास, ते घेऊन आपण तेथे उपस्थित रहावे, असे देखील आपणास कळविण्यात येत आहेत.

खालील कागदपत्रांच्या प्रती सोबत पाठविल्या आहेत :—

(एक) विशेष हक्कभंगाचा प्रश्न ज्यावर आधारित आहे अशी कागदपत्रे ;

(दोन) श्री./श्रीमती .................................. यांची विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करण्यासंबंधीच्या प्रस्तावाची सूचना, दिनांकित ..................

(तीन) विधानसभेच्या दिनांकित रोजीच्या कार्यवाहीतील संबंधित उतारे.

आपला विश्वासू,

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ.



## FIRST SCHEDULE
(*See* paragraph 10)

**A**

*Form of notice to be issued to the persons against whom a breach of privilege is alleged*

No. ........................................................
Maharashtra Legislature Secretariat,
Vidhan Bhavan
Mumbai/Nagpur, dated ...................

From,
The Principal Secretary to the Maharashtra Legislature
To,
...................................................

Sir,

I am to inform you that a question involving breach of privilege of the Maharashtra Legislative Assembly arising out of............................ was raised in the Assembly by ................................ on .......................... The Speaker has referred this question to the Committee of Privileges for examination, determination and report to the Assembly.

2. Please take notice that the question will be taken up for examination by the Committee on ........................................ at .............................. in the Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur, and thereafter on such days and at such times as the Committee may fix from time to time. You are hereby given an opportunity to show cause, if any, on or before the.................why appropriate action should not be recommended against you for breach of privilege of the Assembly. You may, if you so desire, attend the proceedings of the Committee when the question is under examination. You are also informed that if you wish to lead any evidence or produce any document you must come prepared with the same.

Copies of the following papers are sent herewith :—

(*i*) Document on which the question of breach of privilege is based ;

(*ii*) Notice of Motion, dated .......................... by ....................... raising question of privilege.

(*iii*) Relevant extracts from the proceedings of the Legislative Assembly, dated ................................................

Yours faithfully,

Principal Secretary to the
Maharashtra Legislature.

**ब**

**साक्षीदारांना देण्यात यावयाच्या सूचनेचा नमुना**

क्रमांक
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन :
मुंबई/नागपूर, दिनांक

प्रेषक,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ

प्रति,
श्री. .....................................

विषय.—विशेषाधिकार समिती-समितीसमोर पुरावा सादर करणे.

महोदय,

....................... यातून उद्‌भवणारा विशेषाधिकार भंगाचा प्रश्न अध्यक्षांनी महाराष्ट्र विधानसभेच्या विशेषाधिकार समितीकडे सोपविला आहे, हे आपल्याला कळविण्याचा मला निदेश आहे.

मुंबई/नागपूर येथे दिनांक रोजी वाजता भरणाऱ्या समितीच्या बैठकीत आपली साक्ष घेण्याचा निर्णय समितीने दिनांक रोजी भरलेल्या आपल्या बैठकीत घेतला आहे.

या बाबतीत आपण आपला पुरावा देण्यासाठी वर नमूद करण्यात आलेल्या वेळेस आणि तारखेस समितीच्या बैठकीस उपस्थित रहावे अशी आपणांस विनंती करण्याचा समितीच्या अध्यक्षांनी मला निदेश दिला आहे.

दिनांक रोजीच्या महाराष्ट्र विधानसभेच्या कार्यवाहीतील संबंधित उतारे आपल्या माहितीसाठी पाठविण्यात आलेले आहेत.

आपला विश्वासू,

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ.



B

*Form of notice witnesses*

No. ....................................................
Maharashtra Legislature Secretariat,
Vidhan Bhavan,
Mumbai/Nagpur, dated ........................

From,
The Principal Secretary to the Maharashtra Legislature

To,
.................................................................

*Subject*.—Committee of Privileges-Evidence to be tendered before the Committee.

Sir,

I am directed to inform you that the Speaker has referred to the Committee of Privileges of the Maharashtra Legislative Assembly, the question of breach of privilege arising out of ..........................................................

The Committee in its meeting held on ........................................... decided to examine you as a witness in the meeting of the Committee to be held at ................................. on ........................................ in the Vidhan Bhavan, Mumbai/Nagpur.

I am, therefore, directed by the Chairman of the Committee to request you to attend the meeting of the Committee at the time and date as given above to tender your evidence in the matter.

Copies of the relevant extracts from the Maharashtra Legislative Assembly proceedings of ........................................ are enclosed for your information.

Your faithfully,

Principal Secretary to the
Maharashtra Legislature.

## क

**(परिच्छेद ११ पहा)**

**शपथेचा नमुना**

" ईश्वरास साक्षी ठेवून मी शपथ घेतो (अथवा गंभीरपणे प्रतिज्ञा करतो) की, ह्या प्रकरणी मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, तसेच मी काहीही लपविणार नाही आणि माझ्या साक्षीचा कोणताही भाग खोटा असणार नाही. ईश्वर मला सहाय्य करो. "

" मैं सर्व शक्तीमान ईश्वर को साक्षी मान कर, शपथ ग्रहण करता हूँ (अथवा गंभीरतापूर्वक स्वीकार करता हूँ) कि इस मामले में मैं जो साक्षी दूँगा वह सत्य होगी, मैं कुछ भी छिपाऊंगा नहीं तथा मेरी साक्षी का कोई भी अंश असत्य नहीं होगा। अतः ईश्वर मेरी सहायता करे। "

" I swear in the presence of Almighty God (or solemnly affirm) that the evidence which I shall give in this case shall be true, that I will conceal nothing and that no part of my evidence shall be false, So help me God "



## C

(*See* paragraph 11)

*Form of Oath*

" ईश्वरास साक्षी ठेवून मी शपथ घेतो (अथवा गंभीरपणे प्रतिज्ञा करतो) की, ह्या प्रकरणी मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, तसेच मी काहीही लपविणार नाही आणि माझ्या साक्षीचा कोणताही भाग खोटा असणार नाही. ईश्वर मला सहाय्य करो. "

" मैं सर्व शक्तीमान ईश्वर को साक्षी मान कर, शपथ ग्रहण करता हूँ (अथवा गंभीरतापूर्वक स्वीकार करता हूँ) कि इस मामले में मैं जो साक्षी दूँगा वह सत्य होगी, मैं कुछ भी छिपाऊंगा नहीं तथा मेरी साक्षी का कोई भी अंश असत्य नहीं होगा। अतः ईश्वर मेरी सहायता करे। "

" I swear in the presence of Almighty God (or solemnly affirm) that the evidence which I shall give in this case shall be true, that I will conceal nothing and that no part of my evidence shall be false, So help me God "

## दुसरी अनुसूची

(परिच्छेद १७ पहा)

अ

## अधिपत्राचा नमुना

प्रति,

तुरुंग अधीक्षक/तुरुंगरक्षक,

ज्याअर्थी, महाराष्ट्र विधानसभेचे श्री. ................................ यांना त्यांनी विशेषाधिकार भंग केला म्हणून आणि/किंवा उक्त विधानसभेचा आणि/किंवा सन्माननीय अध्यक्षांचा अवमान केला म्हणून दोषी ठरविल्यावरून ;

आणि ज्याअर्थी, उक्त विधानसभेचे ................................ असा ठराव केल्यावरून आणि त्याने ................................ न केल्यामुळे त्यांना ................................ पर्यंत किंवा विधानसभेच्या सत्र समाप्तीपर्यंत या दोहोंपेक्षा जी बाब अगोदर तोपर्यंत तुरुंगात टाकण्यात यावे ;

आणि ज्याअर्थी ................................ यांना असे करण्याचा आदेश दिला असता ;

आणि ज्याअर्थी, सदरहू ................................ यांनी ................................ न केल्यामुळे आणि त्यांनी करेपर्यंत किंवा विधानसभेचे सत्र समाप्त होईपर्यंत म्हणजेच ह्या दोन बाबींपैकी जी बाब अगोदर येईल तोपर्यंत त्यांना तुरुंगात टाकण्यात यावयाचे असल्यामुळे ;

ह्या अन्वये तुम्हांस म्हणजे अधीक्षक (किंवा रक्षक) यांना असा अधिकार देण्यात येत आहे की, त्यांनी ................................ यांना या अधिपत्रासह ताब्यात घ्यावे आणि त्यांना वरील तुरुंगात उपरोक्त कालावधीपर्यंत ठेवावे आणि हे अधिपत्र कसे बजावले याबाबत अधिपत्रावर शेरा लिहून ते अधिपत्र परत करावे.

विधान भवन :<br>
मुंबई/नागपूर.<br>
दिनांक

अध्यक्ष<br>
महाराष्ट्र विधानसभा.



## SECOND SCHEDULE

(*See* paragraph 17)

A

## Form of Warrant

To,

The Superintendent of Jail/Keeper of the Jail.

Whereas the Maharashtra Legislative Assembly has adjudged Shri ............................................................... guilty of breach of previlege and/or of contempt of the said Assembly and/or the Honourable Speaker by ............................................ ;

And whereas the said Assembly has resolved that .................................. to be imprisoned to .......................................................................................... and that on his failing to ...................................................................................... ........................................................................................ or till the House is prorogued, whichever is earlier ;

And whereas the said ...................................................................... was accordingly ordered to ......................................... ;

And whereas the said ...................................................................... has failed to ........................................................................................ and has to be imprisoned in the Jail till he ............................................. ............................................. or till the House is prorogued, whichever is earlier ;

This is to authorise and require your, the Superintendent (or Keeper) to receive the said ..................................................................... into your custody together with this warrant and him safety to keep in the said Jail for the said period returning this warrant with an endorsement certifying the manner of its execution.

**Vidhan Bhavan :**<br>
Mumbai/Nagpur ;<br>
Dated this day of.

Speaker,<br>
Maharashtra Legislative Assembly.

**ब**

**अधिपत्राचा नमुना**

प्रति,

श्री. ................................................. ,

पोलीस आयुक्त, मुंबई

जिल्हा पोलीस अधीक्षक, .............................

ज्याअर्थी, महाराष्ट्र विधानसभेने श्री. ................................................. यांना त्यांनी ................................................. द्वारे विधानसभेचा आणि/किंवा सन्माननीय अध्यक्षांचा विशेषाधिकार भंग आणि/किंवा अवमान केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विधानसभेचे श्री. ................................................. यांना .......................... पर्यंत किंवा विधानसभेच्या सत्र समाप्तीपर्यंत यापैकी जी वेळ आधीची असेल त्या वेळेपर्यंत तुरुंगात ठेवण्याचा निर्णय घेतला आहे ;

त्याअर्थी, तुम्ही श्री. .............................................. यांना ...................................... येथील तुरुंग अधीक्षकाच्या/तुरुंगाधिकाऱ्याच्या ताब्यात द्यावे व त्यांना वरील मुदतीकरिता तुरुंगात ठेवावे असा तुम्हाला निदेश देण्यात येत आहे.

विधान भवन :
मुंबई/नागपूर.
दिनांक :

अध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा.



B

*Form of Warrant*

To,

Shri ..................................................................

<u>Commissioner of Police, Mumbai</u>
District Superintendent of Police, ....................................

Whereas the Maharashtra Legislative Assembly has adjudged Shri ................................................ guilty of breach of privilege and/or of contempt of the said Assembly and/or the Honourable Speaker by ........................................... and whereas the said Assembly has resolved that the said Shri ........................................................... be imprisoned in the Jail till .................................................................. or till the House is prorogued, whichever is earlier, you are hereby directed to arrest the said Shri .......................................................... and to produce him before the Superintendent of Jail ............................................/Keeper of the Jail for being received in his custody and for being kept in the said Jail for the said period.

**Vidhan Bhavan :**
Mumbai/Nagpur ;
Dated this day of

Speaker,
Maharashtra Legislative Assembly.

**क**

**अधिपत्राचा नमुना**

प्रति,

श्री. ................................................. ,

पोलीस आयुक्त, मुंबई

जिल्हा पोलीस अधीक्षक, ..................

ज्याअर्थी, महाराष्ट्र विधानसभेने श्री. .................................................. यांना त्यांनी .................................................. द्वारे विधानसभेचा आणि/किंवा सन्माननीय अध्यक्षांचा विशेषाधिकार भंग आणि/किंवा अवमान केल्याबद्दल दोषी ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, श्री. .................................................. यांना विधानसभेपुढे उपस्थित राहण्यासाठी पाचारण करावे व अध्यक्षांनी त्यांनी सक्त ताकीद द्यावी, असा विधानसभेने निर्णय घेतला आहे ;

आणि ज्याअर्थी श्री. ............................................ यांना ...................................... ............................. रोजी विधानसभेपुढे उपस्थित राहण्याचा आदेश देण्यात आला होता ;

आणि ज्याअर्थी श्री. ............................................. वरील दिवशी विधानसभेपुढे उपस्थित राहिले नाहीत ;

त्याअर्थी, तुम्ही श्री. ............................................... यांना अटक करावी व त्यांना ......................... रोजी ...................... येथे विधानसभेपुढे आणावे असा तुम्हाला निदेश देण्यात येत आहे.

विधान भवन :<br>
मुंबई/नागपूर.<br>
दिनांक :

अध्यक्ष,<br>
महाराष्ट्र विधानसभा.



C

*Form of Warrant*

To,

Shri ..................................................................

Commissioner of Police, Mumbai<br>
District Superintendent of Police, ....................................

Whereas the Maharashtra Legislative Assembly has adjudged Shri ................................................ guilty of breach of privilege and or of contempt of the said Assembly and/or the Honourable Speaker by .................................................................. ;

And whereas the said Assembly has resolved that the said Shri .......................................................... be called to appear at the Bar of the Assembly and be administered by the Honourable Speaker a stern admonition ;

And whereas the said Shri .................................................................. was accordingly ordered to appear before the Bar of the House on .................................... ;

And whereas the said Shri ................................................... has failed to appear before the Bar of the House on the said day, you are hereby directed to arrest the said Shri ........................................... and to produce him before the Bar of the House on ........................................ at............ .............................. .

**Vidhan Bhavan :**<br>
Mumbai/Nagpur<br>
Dated this day of

Speaker<br>
Maharashtra Legislative Assembly.

**निदेश क्र. ८*** **कागदपत्रे व प्रकाशने सदस्यांमध्ये प्रसृत करणे.**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ अनुसार अध्यक्ष खालीलप्रमाणे निदेश देत आहेत :—

**कागदपत्रे व प्रकाशने सदस्यांमध्ये प्रसृत करणे.**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे सदस्यांमध्ये प्रसृत करण्यासाठी भारत सरकारकडून आणि महाराष्ट्र शासनाच्या सचिवालयीन विभागांकडून आलेली कागदपत्रे, दस्तऐवज आणि अहवाल सदस्यांच्या राहण्याच्या ठिकाणी किंवा वितरण केंद्रामार्फत त्यांच्यामध्ये प्रसृत करू शकेल ;

मात्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, हे " गोपनीय " किंवा " गुप्त " म्हणून चिन्हांकित केलेले कागदपत्र, दस्तऐवज किंवा अहवाल विधानमंडळ समितीच्या सदस्यांकरिता असल्याखेरीज आणि त्यांच्या कामकाजाशी संबंधित असल्याखेरीज प्रसृत करणार नाही ;

मात्र, आणखी असे की, सदस्यांमध्ये प्रसृत करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविलेले कागदपत्र, दस्तऐवज किंवा अहवाल प्रसृत करणे, अध्यक्षांना योग्य वाटत नसेल तर ते प्रसृत न करण्याचा निदेश अध्यक्ष देऊ शकतील.

**स्पष्टीकरण.**—या निदेशाच्या प्रयोजनार्थ " कागदपत्र " या शब्दप्रयोगामध्ये राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्री यांच्याकडून आणि सचिवालयीन विभागाकडून त्यांनी आयोजिलेल्या कोणत्याही समारंभाला उपस्थित राहण्यासाठी सदस्यांमध्ये प्रसृत करण्यासाठी आलेली निमंत्रणे यांचा समावेश होतो.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे खालील संस्थांकडून किंवा व्यक्तींकडून परस्पर आलेले कोणतेही कागदपत्र, दस्तऐवज, अहवाल किंवा इतर सामग्री प्रसृत करण्याची जबाबदारी घेणार नाही :—

(१) विदेशी शिष्टमंडळे ;

(२) खाजगी संस्था किंवा व्यक्ती, आणि

(३) संसद आणि महाराष्ट्र विधानमंडळ यांच्या सदस्यांकडून आलेली कागदपत्रे सभागृहाच्या कामकाजाशी संबंधित नसतील तर.

* दिनांक १६ नोव्हेंबर, १९५९ रोजी दिला.



***Direction No. 8**** ***Circulation of Papers and Publications to Members.***

In pursuance of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction :—

**Circulation of Papers and Publications to Members.**

The Maharashtra Legislature Secretariat may circulate to members either at their residence or through the Distribution Centre papers, documents and reports received for circulation to members from the Ministers of the Government of India and Secretariat Departments of the Government of Maharashtra :

Provided that, the Maharashtra Legislature Secretariat shall not undertake circulation of a paper, document or report marked "Confidential" or "Secret" unless it is meant for the members of a Legislature Committee and is connected with their business ;

Provided further that, the Speaker may, if he thinks fit, direct that a paper, document or report forwarded to the Maharashtra Legislature Secretariat for circulation to members may not be circulated.

*Explanation*.—For the purposes of this direction, the expression 'paper' includes invitations received from the Governor, Chief Minister, Ministers and Secretariat Departments for circulation to members to attend any function organized by them.

2. The Maharashtra Legislature Secretariat shall not undertake circulation of any paper, document, report or other material received direct from :—

(1) Foreign mission ;

(2) Private bodies or individuals ; and

(3) Members of Parliament and of the Maharashtra Legislature unless the papers received from them are connected with the business of the House.

* Issued on 16th November, 1959.

**निदेश क्र. ९*** **समितीचे अहवाल अध्यक्षांना सादर करणे**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ च्या तरतुदीनुसार अध्यक्ष खालीलप्रमाणे निदेश देत आहेत :—

**नियम १८६ अन्वये अध्यक्षांना समितीचा अहवाल सादर करणे.**

(१) सर्वसाधारणतः समितीचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल, परंतु सभागृहाचे अधिवेशन चालू नसताना समितीने आपला अहवाल पूर्ण केला तर, समितीप्रमुख तो अहवाल अध्यक्षांना सादर करू शकतील.

(२) अध्यक्ष, नियम १८६ च्या तरतुदीनुसार सभागृहाला अहवाल सादर करण्यापूर्वी तो छापण्यासंबंधी, प्रसिद्ध करण्यासंबंधी किंवा प्रसृत करण्यासंबंधी आदेश देऊ शकेल.

(३) अध्यक्षांना अहवाल सादर करण्यात आला असेल किंवा तो छापण्यासंबंधी, प्रसिद्ध करण्यासंबंधी किंवा प्रसृत करण्यासंबंधी अध्यक्षांनी आदेश दिला असेल तर ही बाब पत्रक भाग दोन मधून अधिसूचित करण्यात येईल.

(४) अहवाल छापण्यापूर्वी, प्रसिद्ध करण्यापूर्वी किंवा प्रसृत करण्यापूर्वी आणि नंतर सभागृहाला सादर करण्यापूर्वी अध्यक्षांना सादर केलेल्या अहवालातील वस्तुस्थितीसंबंधीच्या बाबी किंवा ठळक चुका दुरुस्त करण्यात याव्यात असा निदेश अध्यक्ष देऊ शकतील.

(५) समिती प्रमुखाकडून किंवा त्यांच्या अनुपस्थितीत समितीच्या सभासदांकडून पुढील अधिवेशनाच्यावेळी उपलब्ध होणाऱ्या सर्वप्रथम संधीचा फायदा घेऊन सभागृहाला अहवाल सादर करण्यात येईल. अहवाल सादर करताना समिती प्रमुखाने किंवा त्याच्या अनुपस्थितीत सभासदाने संक्षिप्त निवेदन करावे व सभागृहाचे अधिवेशन चालू नसताना अहवाल अध्यक्षांना सादर करण्यात आला होता व तो छापण्यासंबंधी, प्रसिद्ध करण्यासंबंधी किंवा प्रसृत करण्यासंबंधी अध्यक्षांनी नियम १८६ अन्वये आदेश दिले होते अशा आशयाचे ते निवेदन असावे.

(६) अध्यक्षांना अहवाल सादर केल्यानंतर आणि सभागृहाला अहवाल सादर करण्यापूर्वी विधानसभा विघटित झाली असेल तर उपलब्ध होणाऱ्या सर्वप्रथम संधीचा फायदा घेऊन सचिवांनी नवीन सभागृहाच्या पटलावर अहवाल ठेवला पाहिजे. अशा रीतीने अहवाल ठेवताना एक निवेदन करावे व पूर्वीची विधानसभा विघटित होण्यापूर्वी तिच्या अध्यक्षांना अहवाल सादर करण्यात आला होता ह्या गोष्टीचा त्यात समावेश असावा तसेच अहवाल छापण्याचा, प्रसिद्ध करण्याचा किंवा प्रसृत करण्याचा अध्यक्षांनी नियम १८६ अन्वये आदेश दिला असेल ती वस्तुस्थितीदेखील सचिवांनी सभागृहाला कळविली पाहिजे.

(७) वरील निदेश क्रमांक (६) हा, नियम १९२ अन्वये सभागृहाला सादर करावयाच्या प्रतिवृत्ताला योग्य त्या फेरफारांसह लागू होईल.

---

* दिनांक २५ फेब्रुवारी, १९६७ रोजी दिला.



***Direction No. 9*** ***Presentations of Committee Reports to the Speaker***

In pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction :—

**Presentation of a Report of Committee to the Speaker under rule 186.**

(1) Ordinarily the report of a Committee shall be presented to the House, but in case the Committee complete their report when the House is not in session, the Chairman of the Committee may present it to the Speaker.

(2) The Speaker may under the provisions of Rule 186 order the printing, publication or circulation of the report before it is presented to the House.

(3) Where a report is presented to the Speaker or where its printing, publication or circulation has been ordered by the Speaker, the fact shall be notified in Bulletin, Part II.

(4) The Speaker may direct that matters of factual nature or patent errors may be corrected in the report presented to him before the report is printed, published or circulated and later presented to the House.

(5) The report shall be presented to the House during the next session at the first convenient opportunity by the Chairman or in his absence by a member of the Committee. While presenting the report, the Chairman or in his absence the member presenting the report shall confine himself to a brief statement to the effect, that the report was presented to the Speaker when the House was not in session and that orders for its printing, publication or circulation were given by the Speaker under rule 186.

(6) Where the Assembly is dissolved after the presentation of the report to the Speaker, and before the presentation of the report to the House, the report shall be laid by the Secretary on the Table of the new House at the first Convenient oppurtunity. While laying the report, the Secretary shall make a statement to the effect that the report was presented to the Speaker of the preceding Assembly before its dissolution and where it was ordered by the Speaker to be printed, published or circulated under Rule 186 the Secretary shall also report that fact to the House.

(7) Direction No. (6) above shall apply *mutatis mutandis* to the report required to be made to the House under rule 192.

---

* Issued on 25th February, 1967.

**पुनरीक्षित निदेश क्र. १०*** **तारांकित प्रश्नांचे बॅलट**

दिनांक ९ एप्रिल १९७९ रोजी काढलेला निदेश क्रमांक १० रद्द करून महाराष्ट्र विधानसभा नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदीस अनुसरून अध्यक्ष, विधानसभा यांनी तारांकित प्रश्नांचे पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी सदस्यनिहाय बॅलटसंबंधी पुढीलप्रमाणे निदेश दिला आहे :—

अधिवेशनात प्रश्नोत्तरांसाठी नेमून दिलेल्या प्रत्येक आठवड्यातील प्रत्येक दिवसासाठी स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी सदस्यनिहाय बॅलट लगतच्या पूर्वीच्या आठवड्यातील सोमवारी संध्याकाळी ४-०० वाजता घेण्यात येईल व सोमवारी रजा असल्यास तत्पूर्वीच्या कामकाजाच्या दिवशी संध्याकाळी ४-०० वाजता हे बॅलट घेण्यात येईल.

प्रत्येक दिवसाच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील प्रश्नांवर निर्दिष्ट केलेल्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दाखविण्यात येतील.

* दिनांक २ फेब्रुवारी, १९९९ रोजी दिला.



***Direction No. 10**** ***Ballot for Starred Questions***

In Supersession of the direction No. 10 issued on the 9th April 1979 and in pursuance of the provisions contained in Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker of the Maharashtra Legislative Assembly has issued the following direction regarding memberwise ballot for determining relative precedence of Starred Questions :—

The memberwise ballot for determining relative precedence of the starred questions admitted for each day in every week assigned for questions and answer in the session shall be held at 4-00 p.m. on Monday of the preceding week. In case the said Monday happens to be a holiday the ballot shall be held at 4-00 p.m. on the preceding working day.

The questions in the 1st, 2nd and 3rd rounds in the list of questions and answers for each day shall be shown in accordance with the priority determined by the aforesaid ballot.

* Issued on 2nd February, 1999.

**पुनरीक्षित निदेश क्र. ११*** **अध्यक्ष/उपाध्यक्ष यांची निवडणूक**

दिनांक २७ जुलै, १९७० रोजी दिलेला निदेश क्रमांक ११ रद्द करून महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ च्या तरतुदीनुसार अध्यक्ष/उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीच्या बाबतीत अध्यक्षांनी खालील निदेश दिला आहे :—

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ६(२) किंवा नियम ६(२) व ७ अन्वये सचिवांकडे देण्यात आलेल्या नामनिर्देशनपत्रांची छाननी, सदर नियमातील नियम ६(१) किंवा नियम ७ अन्वये, यथास्थिति, निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेच्या आधीच्या तारखेस दुपारी १२-०० वाजता करण्यात येईल.

यापैकी कोणत्याही निवडणुकीसाठी नामनिर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही सदस्याला निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या तारखेला, मध्यान्हपूर्व, आपण रीतसर सही केलेली लेखी सूचना † स्वतः किंवा या कामासाठी आपल्या वतीने रीतसर लेखी प्राधिकृत केलेल्या आपल्या प्रस्तावक किंवा अनुमोदकाकरवी सचिवांस सादर करून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

**† उमेदवारी मागे घेण्याची सूचना**

अध्यक्ष/उपाध्यक्ष यांची निवडणूक

प्रति,
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

महोदय,

मी, .................................................................... वरील निवडणुकीतील नामनिर्देशित सदस्य, अशी सूचना देतो की, मी माझी उमेदवारी मागे घेत आहे.

ठिकाण :
दिनांक : सदस्याची स्वाक्षरी.

---

* दिनांक २ ऑगस्ट, २००४ रोजी दिला.



***Revised Direction No. 11**** ***Election of Speaker/ Deputy Speaker.***

In supersession of the direction No. 11, dated 27th July, 1970 and in pursuance of the provision of Rules 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction in the matter of election of Speaker/Deputy Speaker :—

Nomination papers delivered to the Secretary under Rule 6 (2) or under Rule 7 read with Rule 6(2) of the Maharashtra Legislative Assembly Rules, will be taken up for scrutiny at 12-00 hrs. on the date preceding the date fixed for election under Rule 6 (1) or as the case may be, Rule 7 of the said Rules.

Any members † nominated for either of these elections may withdraw his candidature by a notice† in writing duly signed by him and delivered to the Secretary before noon on the date fixed for the election, either in person or by his proposer or seconder duly authorised by him in writing in this behalf.

**† Notice of withdrawal**

***Election of the Speaker/ Deputy Speaker***

To,
The Secretary,
Maharashtra Legislative Assembly.

Sir,

I, ......................................................................... a member nominated at the above election do hereby give notice that of withdraw my candidature.

Place :
Date : Signature of the Member.

---

* Issued on 2nd August, 2004.

**निदेश क्र. १२*** **अर्धा–तास चर्चा**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ व नियम ९४ यांतील तरतुदींच्या अनुषंगाने अर्धा-तास चर्चेबाबत अध्यक्ष खालील निदेश देत आहेत :—

अर्धा-तास चर्चेसाठी नेमून दिलेल्या मंगळवार व गुरूवार या दोन दिवसांपैकी प्रत्येक मंगळवार हा, अध्यक्षांनी दिलेल्या निदेशाच्या अधीन राहून, विधानसभेत नुकतेच उत्तर दिलेल्या तारांकित किंवा अतारांकित प्रश्नांचा विषय असलेल्या पुरेशा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्यास नेमून देण्यात येईल.

* दिनांक २३ फेब्रुवारी १९७१ रोजी दिला.



**Direction No. 12*** ***Half-an-Hour Discussion***

In pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assmebly Rules, read with Rule 94 of the said Rules, the Speaker is pleased to issue the following direction in the matter of half-an-hour discussion :—

Of the two days allotted for half-an-hour discussin, *viz.,* Tuesday and Thursday, every Tuesday shall, subject to the direction of the Speaker, be allotted for raising discussion on a matter of sufficient public importance, which has been the subject matter of question, Starred or Unstarred, recently answered in the Assembly.

* Issued on 23rd February 1971

**पुनरीक्षित निदेश क्रमांक १३*** **लक्षवेधी सूचना**

दिनांक ११ ऑगस्ट, १९९९ चा निदेश क्रमांक १३ रद्द करून महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार मा. अध्यक्षांनी दिलेले निदेश या पुस्तिकेतील पुनरिक्षित निदेश क्रमांक १३ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात :—

"तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मंत्र्यांचे लक्ष वेधण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १०५ अन्वये सूचना देण्याची सदस्यांची इच्छा असल्यास अशा लक्षवेधी सूचना MOIS या संगणक प्रणालीवर संपूर्णतः ऑनलाईन (Online) पद्धतीने सत्र सुरू होण्यापूर्वी पाच दिवसांहून (रविवार व सुट्टीचे दिवस वगळून) अगोदर नव्हे अशा पद्धतीने सकाळी ११-०० ते सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत या सचिवालयाकडे पाठवाव्यात. पाच दिवसांहून अगोदर आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठीचा अंतिम दिवस असेल. लक्षवेधी सूचनेचा विषय हा तातडीचा व महत्त्वाचा आहे किंवा कसे हे काटेकोरपणे ठरवूनच अशी सूचना मान्य करण्यात येईल. मान्य सूचनांपैकी कोणत्या तीन सूचना सभागृहात घ्यावयाच्या याबाबतीत अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहील."

* दिनांक १२ नोव्हेंबर, २००९ रोजी दिला.



**Revised Direction No. 13*** ***Calling Attention Notices***

In compliance with the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the following amendments shall be made in the revised directive No. 13 in the booklet titled 'Directives of Hon. Speaker' and the directive no. 13 dated 11th August 1999 shall stand revoked :—

"If the members wish to submit notices under Rule No. 105 of Maharashtra Legislative Assembly Rules in order to call attention of the concerned Ministers to any matter of urgent and public importance, then such calling attention notices may be submitted to this Secretariat using the entirely online platform of MOIS System not earlier than five days before the commencement of the Session (excluding Sundays and Holidays) between 11-00 a.m. upto 5-00 p.m. to this Secretariat. The notices which have been received earlier than the said five days shall not be entertained. Similarly, the last day to receive calling attention notices shall be a full official day before the 3rd day from day of prorogation of the Session. Such notices shall be admitted only after subjecting it to meticulous examination to decide whether or not the subject of the concerned calling attention notice is urgent and significant. The decision taken by the Hon. Speaker as to which calling attention notices out of the admitted ones would be taken up for discussion in the House shall remain final."

* Issued on 12th November, 2009.

**निदेश क्रमांक १४*** **संयुक्त/चिकित्सा समिती**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ मधील तरतुदींच्या अनुषंगाने संयुक्त समितीच्या/चिकित्सा समितीच्या अहवालांच्या बाबतीत अध्यक्ष खालील निदेश देत आहेत :—

संयुक्त समितीच्या/चिकित्सा समितीच्या अहवालात, त्या समितीने एकमताने काढलेल्या निष्कर्षाची विश्वसनीयरीत्या व बिनचूकपणे नोंद घेतलेली असल्यास व तो अहवाल एकमताने काढलेल्या उपरोक्त निष्कर्षाशी सुसंगत असल्यास, त्या अहवालाला भिन्न मतपत्रिका जोडण्यात येणार नाही.

* दिनांक ११ डिसेंबर, १९७३ रोजी दिला.



**Direction No. 14*** ***Joint/Select Committee***

In pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules the Speaker is pleased to issue the following direction in the matter of Report of the Joint Committee/Select Committee :—

When the Report of the Joint Committee/Select Committee, records faithfully and accurately the unanimous conclusions arrived at by the Committee and is in consonance with those unanimous conclusions, no minute of dissent shall be appended to the Report.

* Issued on 11th December, 1973.

**निदेश क्रमांक १५*** **रोजगार हमी योजना समिती**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १९० नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून अध्यक्षांनी खालील निदेश दिले आहे :—

**रोजगार हमी योजना समितीच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी अंदाज समिती प्रमुख आणि लोकलेखा समिती-प्रमुख यांना आमंत्रित करणे.**

रोजगार हमी योजना समितीला आवश्यक वाटल्यास, अंदाज समितीप्रमुख आणि लोकलेखा समितीप्रमुख यांना तिच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी आणि तिच्या कामकाजासंबंधीच्या चर्चेत भाग घेण्यासाठी ती आमंत्रित करू शकेल.

* दिनांक १८ सप्टेंबर, १९७५ रोजी दिला.



**Direction No. 15*** ***Committee on Employment Guarantee Scheme.***

In exercise of the powers conferred on him by Rule 190 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction, namely :—

**Invitation to the Chairman of the Estimates Committee and the Chairman of the Public Accounts Committee to attend the meetings of Committee on Employment Guarantee Scheme.**

The Committees on Employment Guarantee Scheme may, if it so considers necessary, invite the Chairman of the Estimates Committee and the Chairman of the Public Accounts Committee to attend its meeting and to participate in its deliberations.

* Issued on 18th September, 1975.

**निदेश क्रमांक १६*** **अंदाज समिती**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १९० अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून अध्यक्षांनी खालील निदेश दिले आहेत :—

**उप-समितीचे प्रमुख म्हणून काम करण्यासाठी आमंत्रकांची नेमणूक करणे.**

१. अंदाज समिती, महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १७२ अन्वये तिने गठीत केलेल्या उप-समित्यांच्या बैठकांमध्ये प्रमुख म्हणून काम करण्यासाठी तिला आवश्यक वाटल्यास, एका किंवा अधिक आमंत्रकांची नेमणूक करील ;

**उप-समितीसाठी गणपूर्ती.**

२. (एक) महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १७२ अन्वये गठीत केलेल्या अंदाज समितीच्या उप-समितीच्या बैठकीची गणपूर्ती होण्यासाठी दोनपेक्षा कमी सदस्य नसले पाहिजेत ;

(दोन) उप-समितीच्या बैठकींच्या गणपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या इतर गोष्टींसंबंधात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम १६८ मधील पोट-नियम (२) व (३) च्या तरतुदी लागू होतील ;

**बैठकींना उपस्थित राहण्यासाठी मंत्र्यांना आमंत्रित करणे.**

३. अंदाज समितीला किंवा तिच्या उप-समितीला आवश्यक वाटल्यास तिच्या बैठकींना उपस्थित राहून कामकाजात भाग घेण्यासाठी ती मंत्र्यांना आमंत्रित करील, परंतु अशा बैठकीत त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

---

* दिनांक ६ एप्रिल, १९७६ रोजी दिला.



**Direction No. 16*** ***Committee on Estimates***

In exercise of the powers conferred on him by Rule 190 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following directions :—

**Appointment of Conveners to act as Chairman of the Sub-Committee.**

1. The Committee on Estimates may, if it so considers necessary, appoint one or more conveners, to act as Chairman at the sitting of the Sub-Committees, constituted by the Committee under Rule 172 of the Maharashtra Legislative Assembly Rules.

**Quorum for the Sub-Committee.**

2. (*i*) The quorum to constitute a sitting of a Sub-Committee of Estimates Committee constituted under Rule 172 of the Maharashtra Legislative Assembly Rules, shall be not less than two members ;

(*ii*) As regards the other requirements regarding quorum at the sittings of the Sub-Committee the provisions of sub-rules (2) and (3) of Rule 168 of the Maharashtra Legislative Assembly Rules shall apply.

**Invitation to the Minister to attend the meetings.**

3. The Committee on Estimates or its Sub-Committee may, if it so considers necessary invite a Minister to attend its meetings and to participate in its deliberations, but he will have no right to vote at such meetings.

---

* Issued on 6th April, 1976.

**निदेश क्रमांक १७*** **तारांकित, अतारांकित, अल्पावधी प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा, ठराव, प्रस्ताव इत्यादी, महाराष्ट्र विधानसभा नियमाप्रमाणे नोटीस देणे आवश्यक असणाऱ्या, संसदीय आयुधांच्या सूचना फॅक्सद्वारे स्वीकारणे—कार्यपद्धती.**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार सदस्यांकडून फॅक्सद्वारे प्राप्त होणाऱ्या सूचना कार्यवाहीमध्ये घेण्यासाठी अध्यक्षांनी खालील निदेश दिलेले आहेत :—

अधिवेशनात एखाद्या विशिष्ट सार्वजनिक महत्त्वाच्या व तातडीच्या विषयावर महाराष्ट्र विधानसभा नियमातील विहित मुदतीत व नमुन्यात सदस्यांकडून तारांकित, अतारांकित, अल्पावधी प्रश्न, लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा, ठराव, प्रस्ताव इत्यादीबाबत महाराष्ट्र विधानसभा नियमांप्रमाणे नोटीस देणे आवश्यक आहे, अशा संसदीय आयुधांच्या सूचना फॅक्सद्वारे प्राप्त झाल्यास अशा सूचना जणू काही स्वतः सदस्यांनीच लेखी स्वरूपात सचिव यांना दिलेल्या आहेत असे समजून कार्यवाहीसाठी घेण्यात येतील.

**उपरोक्त निदेशाची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील :—**

(१) उपरोल्लिखीत सर्व संसदीय आयुधांच्या सूचना नमुन्यात व विहित मुदतीत देणे आवश्यक आहे.

(२) अपूर्ण, अस्पष्ट, त्रोटक व वाचता न येणाऱ्या सूचना कार्यवाहीसाठी घेतल्या जाणार नाहीत.

(३) उपरोल्लिखित सूचनांवरील सदस्यांची सही ही त्यांनीच केलेली आहे असे गृहीत धरण्यात येईल.

---

* दिनांक २७ फेब्रुवारी, २००२ रोजी दिला.



**Direction No. 17*** **Acceptance through fax of the Notices of Parliamentary devices to be given under the M.L.A. Rules regardings Starred, Unstarred Questions, Short Notice Questions, Calling Attention Notices, Half-an-Hour Discussion, Resolutions, Motions etc.—Procedure.**

In pursuance of the Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, Speaker has given following directions in the matter of processing of the notices received from the Members through fax :—

If notices of Parliamentary devices like Starred, Unstarred, Short Notice Questions, Calling Attention Notices, Half-an-Hour Discussion, Resolutions, Motions etc. which are required to be given by the members on any particular matter of urgent and public importance within a prescribed period and in prescribed form during Session as per the Maharashtra Legislative Assembly Rules, are received through fax, then such notices shall be taken up for further processing by treating them as if they have been given by the concerned members themselves in writing to the Secretary.

**The procedure for compliance of the aforesaid directions shall be as follows :—**

(1) It is necessary to give the notices of all the aforementioned parliamentary devices in a prescribed form and within a prescribed period.

(2) Incomplete, vague, ambiguous and illegible notices shall not be dealt with further.

(3) It shall be presumed that, the signature of the Member on the aforesaid notices is made by the Member himself / herself.

---

* Issued on 27th February, 2002.

(४) विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई, कार्यालयातील फॅक्स (क्रमांक : ०२२-२२०२४५२४) वरच प्राप्त होणाऱ्या सूचनांची नोंद त्यावरील दिनांक व वेळेनुसार आवक कक्षामध्ये घेण्यात येईल. विधान भवनातील इतर फॅक्सवर प्राप्त होणाऱ्या सूचना कार्यवाहीसाठी घेण्यात येणार नाहीत.

(५) कार्यालयीन वेळेतच फॅक्सद्वारे प्राप्त होणाऱ्या उपरोल्लिखित सूचना कार्यवाहीसाठी घेतल्या जातील. कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना त्यानंतरच्या लगतच्या कामकाजाच्या दिवशी प्राप्त झाल्याचे समजण्यात येईल.

(६) स्थगन प्रस्तावाच्या सूचना विधानसभेच्या ज्या बैठकीत तत्संबंधी अनुमती मागावयाची आहे त्या बैठकीच्या सुरुवातीपूर्वी निदान एक तास अगोदर स्वीकारल्या जातात. त्यामुळे फॅक्सद्वारे फक्त त्याच दिवशी विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचना स्वीकारल्या जातील.

(७) सदस्यांकडून फॅक्सद्वारे प्राप्त झालेल्या सूचना आणि सदस्य/त्यांचे प्रतिनिधी व पक्ष प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून दिलेल्या सूचना एकाच वेळी प्राप्त झाल्यास प्रत्यक्ष उपस्थित राहून दिलेल्या सूचनांना प्राथम्यक्रम दिला जाऊन आवक कक्षात क्रमवारी लावताना फॅक्सद्वारे प्राप्त झालेल्या सूचनांची क्रमवारी नंतर लावण्यात येईल.



(4) The entry of only those notices which are received on fax (fax No. 022-22024524) in the office of the Maharashtra Legislature Secretariat, Vidhan Bhavan, Mumbai will be taken in the inward section as per the date and time mentioned on such notices. The notices received on other fax numbers in Vidhan Bhavan shall not be taken up for further processing.

(5) The abovementioned notices which are received only within the office hours shall be taken up for further processing. The notices received after the office hours shall be treated as received on the next working day.

(6) The notices of Adjournment Motion are accepted at least one hour before the commencement of the sitting of the Legislative Assembly at which the leave of the Assembly to move the concerned notice is to be asked for. Hence, only those notices which are received through fax on the same day within the prescribed period shall be accepeted.

(7) If the notices received from the members through fax and the notices given by the members or their representatives and the representatives of the parties in person are received at the same time then, order of priority shall be given to the notices which are given in person and while arranging the order of the notices in the Inward section, the order of the notices received through fax shall be placed thereafter.

**पुनरीक्षित निदेश क्रमांक १८*** **अर्धा-तास चर्चा (सर्वसाधारण)**

दिनांक १६ जुलै, २०१८ चा निदेश क्रमांक १८ रद्द करून महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ५८ व नियम ९४ यातील तरतुदींच्या अनुषंगाने अर्धा तास चर्चेबाबत माननीय अध्यक्षांनी खालील निदेश दिले आहेत :—

म.वि.स. नियम ९४ (२) (अ) अन्वये अर्धा तास चर्चेच्या (सर्वसाधारण) सूचना, अधिवेशन सुरू होण्यापूर्वी १५ दिवसांहून अगोदर नव्हे अशा दिनांकापासून MOIS या संगणक प्रणालीवर संपूर्णतः (Online) पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

परंतु, अशा दिवशी रविवार अथवा कार्यालयीन सुट्टी असल्यास त्या दिनांकालगतपूर्वीच्या कार्यालयीन दिवसापासून अशा सूचना स्वीकारण्यात येतील.

म.वि.स. नियम ९४ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अर्धा तास चर्चा (सर्वसाधारण) उपस्थित करणाऱ्या कोणत्याही सदस्याला विधानसभेच्या एका अधिवेशनासाठी १० सूचनांची असलेली मर्यादा २५ एवढी वाढविण्यात आली आहे.

तसेच अधिवेशन संपण्याच्या शेवटच्या आठवड्यातील सर्वसाधारण अर्धा-तास चर्चेच्या बॅलेट पूर्वी कामकाजाच्या पूर्ण ३ दिवस अगोदर सूचना स्वीकारणे बंद करण्यात येईल.

* दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४.



**Revised Direction No. 18*** ***Half-an-Hour Discussion (General)***

In Supersession of the Direction No. 18 issued on 16th July, 2018 and in pursuance of the provisions contained in Rule 58 and Rule 94 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction regarding Half-an-Hour discussion :—

The notices of Half-an-Hour discussion (General) shall be accepted under M.L.A. Rule 94(2)(A) exclusively through online method on the MOIS computer system from such date not prior to 15 days before the commencement of the session.

However, in case, if such a day happens to be a Sunday or an official holiday, then such notices shall be accepted on the preceding working day.

The prevailing limit of 10 notices for a session of the Legislative Assembly has been extended to 25 notices for any member to rise Half-an-Hour Discussion (General) on matters of public importance under M.L.A. Rule 94.

However, this duration for accepting notices of Half-an-Hour discussion shall end 3 clear days prior to holding ballot for notices of general Half-an-Hour discussion in the last week of the session.

* Issued on 08th November 2024.

**पुनरीक्षित निदेश क्रमांक १९*** **अशासकीय ठरावांच्या सूचना स्वीकारणे**

दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजीचा निदेश क्र. १९ रद्द करून, महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदींनुसार अध्यक्षांनी महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १०६ अन्वये द्यावयाच्या अशासकीय ठरावांच्या सूचनांच्या बाबतीत खालील निदेश दिले आहेत :—

**म.वि.स. नियम १०६ अन्वये अशासकीय ठरावांच्या सूचना, अधिवेशन सुरू होण्यापूर्वी तीस दिवसांपासून अगोदर नव्हे अशा दिनांकापासून ROIS या संगणक प्रणालीवर संपुर्णतः ऑनलाईन (online) पद्धतीने स्वीकारण्यात येतील.**

परंतु, अशा दिवशी रविवार अथवा कार्यालयीन सुट्टी असल्यास त्या दिनांकालगतपूर्वीच्या कार्यालयीन दिवसापासून अशा सूचना स्वीकारण्यात येतील.

**अधिवेशनामध्ये अशासकीय ठरावाचे शेवटचे बॅलेट होण्यापूर्वी कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदर सूचना स्वीकारणे बंद करण्यात येईल.**

* दिनांक ८ नोव्हेंबर, २०२४



**Revised Direction No. 19*** ***Acceptance of notices of Private Members' Resolutions.***

In Supersession of the Direction No. 19 issued on 28/04/2014 and in pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction regarding notices of Private Members' resolutions to be given under Rule 106 of Maharashtra Legislative Assembly Rules :—

The notices of Private Members' resolution shall be accepted under M.L.A Rule 106 exclusively through online method on the ROIS Computer System from such date not prior to thirty days before the commencement of the session.

However, in case, if such a day happens to be a Sunday or official holiday, then such notices shall be accepted on a preceding working day.

However, this duration for accepting notices of Private Member's Resolutions shall end 3 clear office working days prior to the last ballot of Private Members' Resolution in the session.

* Issued on 8th November 2024.

**निदेश क्रमांक २०*** **स्थगन प्रस्तावाची सूचना स्वीकारणे**

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५८ मध्ये असलेल्या तरतुदींनुसार अध्यक्षांनी महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ९७ अन्वये द्यावयाच्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनांच्या बाबतीत खालील निदेश दिले आहेत :—

म.वि.स. नियम ९७ अन्वये निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या कोणत्याही विविक्षित बाबीची चर्चा करण्यासाठी विधानसभेचे कामकाज स्थगित करण्याकरिता 'स्थगन प्रस्तावाची सूचना' AMOIS या संगणक प्रणालीवर संपूर्णतः (Online) पद्धतीने स्वीकारण्यात येईल.

स्थगत प्रस्ताव मांडू इच्छिणारा सदस्य, विधानसभेच्या ज्या बैठकीत आपला प्रस्ताव मांडण्यासाठी विधानसभेची अनुमती मागण्याचे त्याने योजले असेल त्या बैठकीच्या सुरुवातीपूर्वी निदान एक तास अगोदर संगणकीय प्रणालीद्वारे सूचना सादर करेल.

* दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४

**Direction No. 20*** ***Acceptance of notices of Motions for Adjournments.***

In pursuance of the provisions of Rule 58 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the Speaker has issued the following direction regarding notices of Motions For Adjournments to be given under Rule 97 of Maharashtra Legislative Assembly Rules:-

The notices mentions for adjournments shall be accepted under M.L.A. Rule 97 exclusively through online method on the AMOIS computer system for the adjournment of the business of the Legislative Assembly for the purpose of discussing a definite matter of urgent public importance.

A Member desiring to move such a motion for adjourment shall submit such notice through computer system not later than one hour before the commencement of the sitting of the Assembly at which he proposes to ask for leave of the Assembly to move his motion.

* Issued on 08th November 2024.

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**

एचबी १५६७—१

एचबी १५६७—१अ

एचबी १५६७—२

एचबी १५६७—२अ

एचबी १५६७—३

एचबी १५६७—३अ

एचबी १५६७—४

एचबी १५६७—४अ

एचबी १५६७—४

एचबी १५६७—४अ

(शा.म.मु.) एचबी १५६७—५ (७००—११-२०२४)

एचबी १५६७—५अ

एचबी १५६७—१

एचबी १५६७—१अ

एचबी १५६७—२

एचबी १५६७—२अ

एचबी १५६७—३

एचबी १५६७—३अ

एचबी १५६७—४

एचबी १५६७—४अ

एचबी १५६७—४

एचबी १५६७—४अ

(शा.म.मु.) एचबी १५६७—५ (७००—११-२०२४)

एचबी १५६७—५अ